
Good
MORNING
Have a nice day..
Inspiritquote.com

**Dr. Siddharth Somnath Ghoderao**

**Department of Geography**

**Vivekanand College, Kolhapur**

# Subject:-Population Geography

Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

Syllabus, B.A. ( Part III ) Geography (Introduced From July, 2023 Onwards) CBCS System,

Paper IX, Semester - V

Population Geography1Or Social Geography2

| Module | Population Geography[1] | (No. of Credits) |
|---|---|---|
| **Module I** | **Introduction to Population Geography** | **01**(15 Lectures) |
| | 1.1 Definition, Nature and scope of Population Geography<br>1.2 Significance of Population Geography<br>1.3 Sources of Population Data | |
| **Module II** | **Population Growth and Distribution** | **01**(15Lectures) |
| | 2.1 World Population Growth<br>2.2 Factors affecting on population distribution.<br>2.3 Population distribution of the world<br>2.4 Theories of Population Growth: Malthus Theory and Demographic Transition Theory | |
| **Module III** | **Population Dynamics and Pandemics** | **01**(15 Lectures) |
| | 3.1 Concept of Population Dynamics and Pandemics<br>3.2 Effects of Covid 19 on Fertility, Mortality and Migration<br>3.3Fertility: Causes, Effects and Measures<br>3.4Mortality: Causes, Effects and Measures<br>3.5 Migration: Causes, Effects and Measures | |
| **Module IV** | **Population Composition and Characteristics** | **01**(15 Lectures) |
| | 4.1 Age: Causes, Effects, Measures and Characteristics<br>4.2 Sex: Causes, Effects, Measures and Characteristics<br>4.3 Literacy: Causes, Effects, Measures and Characteristics<br>4.4 Rural and Urban Composition: Causes, Effects and Characteristics | |

**References:-**

**1.Barrett H. R., 1995: Population Geography, Oliver and Boyd.**

| Module/Unit: | |
| --- | --- |
| **Module- I – Introduction to Population Geography** | ➢ Definitions of Population Geography.<br>➢ Nature of Population Geography<br>➢ Scope of Population Geography. |
| **Module/Unit:** | |
| **Module- I- Introduction to Population Geography** | ➢ Significance of Population Geography<br>➢ Sources of Population Data |
| **Module/Unit:** | |
| **Module- III – Population Dynamics and Pandemics** | ➢ Concept of Population Dynamics and Pandemics<br>➢ Effects of Covid 19 on Fertility, Mortality and<br>➢ Definition of Migration<br>➢ Types of Migration |
| **Module/Unit:** | |
| **Module- III - Population Dynamics and Pandemics** | ➢ Fertility: Causes, Effects, and Measures<br>➢ Mortality: Causes, Effects, and Measures<br>➢ Migration: Causes, Effects, and Measures |

# लोकसंख्या भूगोल

## Unit-1

### लोकसंख्या भूगोल परिचय

1.1 लोकसंख्येची भूगोलाची  व्याख्या, स्वरूप आणि व्याप्ती

1.2 लोकसंख्या भूगोलाचे महत्त्व

1.3 लोकसंख्येच्या माहितीचे स्रोत

## Unit- 3

### लोकसंख्या गतिशीलता आणि महामारी

3.1 लोकसंख्या गतिशीलता आणि महामारीची संकल्पना

3.2 कोविड 19 चा प्रभाव - प्रजनन क्षमता,मृत्युदर आणि स्थलांतर

3.3 प्रजनन: कारणे, परिणाम आणि उपाय

3.4 मृत्यू: कारणे, परिणाम आणि उपाय

3.5 स्थलांतर: कारणे, परिणाम आणि उपाय


Thank you


Good
MORNING
Have a nice day..
Inspiritquote.com

**Dr Siddharth Somnath Ghoderao**

**Department of Geography**

**Vivekanand College, Kolhapur**



## १.१ प्रस्तावना

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक प्रमुख शाखा आहे. या विषयाचे स्वरुप इतके विस्तृत आहे की, त्याचा स्वतंत्र अभ्यास विशिष्ट अशा शाखेमध्ये करावा लागतो. त्रिवार्थास लोकसंख्या भूगोलाचे जनक मानतात. कारण १९५३ मध्ये अमेरिकन भूवैज्ञानिकांच्या मेळाव्यात बोलताना लोकसंख्या भूगोल ही एक स्वतंत्र शाखा आहे असे त्याने प्रतिपादन केले. दुसऱ्या महायुध्दानंतर बरेचसे देश वसाहत वादातून मुक्त झाले. त्यांनी विकासाला सुरुवात केली. परंतु सतत वाढणाऱ्या लोकसंख्या व्दारे विविध प्रकारचे प्रश्न निर्माण झाले. त्यातूनच लोकसंख्या भूगोलविषयी जागरुकता निर्माण झाली म्हणूनच लोकसंख्या भूगोल हा भूगोल विषयाला अलिकडे फुटलेला एक अंकूर आहे.

## १.२ लोकसंख्या भूगोलाचा उगम व विकास :

दुसऱ्या महायुध्दानंतर लोकसंख्या भूगोल या विषयाचा विकास झाला असला तरी लोकसंख्येसंबंधीचा अभ्यास फार पूर्वीपासून चालू आहे. ख्रिस्तपूर्व ३२१ ते २६९ दरम्यान 'कौटिलिय अर्थशास्त्र' नामक ग्रंथात लोकसंख्येची आर्थिक व शेती संबंधात गणती कशी करावी याचे विवेचन आढळते. लोकसंख्येच्या शास्त्रशुध्द अभ्यासास १७ व्या शतकापासून सुरुवात झालेली आढळते. जॉन ग्रॉट याने लंडन व सभोवतालच्या परिसर येथील मृत्यूदाखले वापरुन महत्वाचे लोकसंख्या विषयक निष्कर्ष काढले. १७ व्या शतकात ससूमिल्य या जर्मन अभ्यासकाने मोठा ग्रंथ लिहून त्यात मृत्यूसारणी तयार केली. १७६६ ते १८३४ या दरम्यान थॉमस माल्थस याने लोकसंख्या वाढीचा वेग व अन्नधान्य उत्पादनाचा वेग यातील तफावत जाणून एक महत्वाचा सिध्दांत मांडला. म्हणूनच माल्थसला लोकसंख्या विज्ञानाचा जनक असे म्हटले जाते.

१९ व्या शतकात वैद्याकिय शास्त्रात प्रगती होऊ लागली. त्याचा परिणाम म्हणजे मृत्यूदर झपाट्याने खाली येऊ लागला. संसर्गजन्य रोगावर मात करण्यात आली. आयुर्मानात वाढ झाली व लोकसंख्या वाढीवर परिणाम झाला. १९ व्या शतकाच्या अखेरीस जनन या घटकाबद्दल अभ्यास सुरु झाला. १९ व्या शतकातच लोकसंख्या शास्त्रातील स्थलांतर या महत्वपूर्ण अंगाच्या अभ्यासालाही महत्व प्राप्त होऊ लागले. म्हणूनच लोकसंख्या अभ्यासाला मोठी चालना मिळाली.

दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक अविकसित देश स्वतंत्र झाले. देशातील लोकांच्या विकासासंबंधीच्या आकांक्षा वाढल्या. लोकसंख्या हा घटक कित्येक देशाच्या जलद विकासास अडसर ठरु लागला व त्यामुळे त्या देशाच्या भौगोलिक पार्श्वभूमीच्या व नैसर्गिक संपत्तीच्या संदर्भात लोकसंख्येचा अभ्यास सुरु झाला. या विषयाची जगभर प्रगती करण्यात आली. आणि विकसनशील राष्ट्रामध्ये लोकसंख्येच्या अभ्यासास उत्तेजन देण्यात युनायटेड नेशन्सचा फार मोठा वाटा आहे.

१९५९ मध्ये त्रिवार्ता यांनी लोकसंख्या भूगोलाला एक स्वतंत्र विषय म्हणून स्थान म्ळवून दिले. त्यातूनच लोकसंख्या भूगोल या नव्या ज्ञानशाखेचा जन्म झाला. पदवी पातळीवर लोकसंख्या भूगोल हा विषय आणणारे व त्यादृष्टीने अभ्यासक्रमाची रचना करणारे त्रिवार्ता हेच पहिले भूगोलतज्ञ होते. यानंतर अमेरीकेतील व त्यामागोमाग जगातील अनेक विद्यापीठातून हा विषय स्वतंत्र विषय म्हणून शिकवला जाऊ लागला. क्लार्क यांनी या विषयात भर टाकली.

## १.३ लोकसंख्या भूगोल व्याख्या

१) पृथ्वीच्या पृष्ठभागावर वितरीत झालेल्या लोकांचा किंवा प्रदेशातील प्राकृतिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकांचा त्या समुहाशी असलेला संबंध म्हणजे लोकसंख्या भूगोल होय. - त्रिवार्ता.

२) लोकसंख्या वितरण, घटना, स्थलांतर यांच्यातील क्षेत्रीय विविधता ही स्थलीय स्वरुप व विविधतेशी कशी निगडीत आहे याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे लोकसंख्या भूगोल होय. - क्लार्क

३) प्रादेशिक भिन्नतेनुसार मानव जाती मधील वेगळेपणा अभ्यास म्हणजेच लोकसंख्या भूगोल होय किंवा लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येच्या प्रादेशिक वितरणाचा स्थलकालसापेक्ष अभ्यास होय.

## १.४ लोकसंख्या भूगोलाचे स्वरुप व व्याप्ती

लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची एक स्वतंत्र शाखा आहे. इतर शास्त्रातील तज्ञांनी या अभ्यासाला यथाशक्ती मदत केली आहे. लोकसंख्या भूगोलात 'मानव' हाच केंद्रबिंदू मानला जातो. लोकसंख्या भूगोल हा विषय बहुव्यापी स्वरुपाचा असून मानव या घटकाच्या अस्तित्वाद्वारे तो बहूस्पर्शी देखील झाला आहे. भूपृष्ठातील मानव हा एक महत्वाचा घटक म्हणून लोकांचा अभ्यास केला जातो. पृथ्वीवर बदल घडवून आणणाऱ्या इतर विघटकांप्रमाणेच मानव हा एक अतिशय मूलभूत घटक आहे. लोकसंख्या समस्या कशा निर्माण करते. या समस्या सोडविण्यासाठी भौगोलिक दृष्टीकोनातून विचार करावा लागतो. याचा अभ्यास लोकसंख्या भूगोलामध्ये केला जातो.

लोकसंख्येचा प्रदेशानुसार अभ्यास, प्रदेशानुसार लोकसंख्येमध्ये असलेली भिन्नता प्रदेशानुसार असलेली वैशिष्ट्ये ही लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासातील अंगे आहेत. लोकसंख्येत प्रदेशानुसार भिन्नता कशी निर्माण झाली हे लोकसंख्येच्या अभ्यासावरुन सहज लक्षात येते. लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या वाढ, स्थलांतर, लोकसंख्येची वैशिष्ट्ये, धर्म, जात, वंश, राहणीमानाचा दर्जा, स्त्री पुरुषांचे प्रमाण, लोकसंख्येची जागतिक, सामाजिक रचना व त्याच्या सभोवताली असणाऱ्या पर्यावरणातील घटकांचा संबंध हा लोकसंख्येच्या भूगोलाच्या अभ्यासाचा प्रमुख विषय आहे.

मानस शास्त्रीय व सामाजिक स्थितीचाही लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासात आढावा घ्यावा लागतो. म्हणूनच आतर सामाजिक शास्त्राशी भूगोलाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येतो.

१) **लोकसंख्या वितरणाचा अभ्यास** - या भागात लोकसंख्येचे व लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचे खंड, देश राज्य, प्रदेश त्याचे वितरण स्पष्ट केले जाते. वितरणाचे स्वरुप भूतकाळात झालेले बदल याचा विचार या गटात केला जातो.

२) **लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास** - यात लोकसंख्येची घनता, तिचे विविध प्रकार त्यावर परिणाम करणारे भौगोलिक व सांस्कृतिक घटक आणि जागतिक लोकसंख्येच्या घनतेचा आकृतीबंध यांचा समावेश होतो.

३) **लोकसंख्या स्थलांतर** - यात प्रामुख्याने देशातील अंतर्गत भागात व देशाबाहेर होणारी स्थलांतरे, स्थलांतरास प्रवृत्त करणारे घटक, स्थलांतराचे प्रकार आणि परिणाम. स्थलांतराचा भौगोलिक स्वरुपावर व भौगोलिक स्वरुपाचा स्थलांतर वर होणारा परिणाम याचा समावेश होतो.

४) **लोकसंख्येची वाढ** - लोकसंख्येत बदल घडवून आणणारे जन्म, मृत्यू त्यांची मोजण्याची परिमाणे, प्रदेशानुसार जन्मदरातील व मृत्यूदरातील कल व त्यावर परिणाम करणारे घटक लोकसंख्या वाढीबद्दल सिध्दांत इत्यादींचा समावेश या गटात केला जातो.

५) **लोकसंख्येची रचना** - यात धर्म, वंश, वय, लिंग, जात, व्यवसाय, शिक्षण, आर्थिक दर्जा वैवाहिक स्थिती या निकषावर आधारीत लोकसंख्येची विभागणी, त्यांची वैशिष्ट्ये भौगोलिक परिस्थितीचा त्यावर झालेला परिणाम याचा अभ्यास केला जातो.

६) **लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण** - लोकसंख्या अभ्यासात याला विशेष महत्व आहे. साक्षरतेचे निकष प्रदेशानुसार साक्षरतेचे प्रमाण, साक्षरता व लोकांची गुणवत्ता याचा अभ्यास यात केला जातो.

७) **ग्रामीण नागरी लोकसंख्या** - ग्रामीण नागरी लोकसंख्येची वैशिष्ट्ये, नागरीकरण प्रक्रिया, जगातील विविध प्रदेशातील नागरीकरणाचा कल व परिणाम इत्यादीचा समावेश यामध्ये होतो.

८) **लोकसंख्या व नैसर्गिकसाधन संपत्ती** - साधन संपत्तीचा विकास, साधन संपत्तीच्या विकासावर लोकसंख्या वाढीचा परिणाम, लोकसंख्येचा अतिरिक्त भार, विविध प्रदेशातील लोकसंख्या व साधन संपत्ती, आणि तंत्रज्ञान यामध्ये योग्य संतुलन साधण्यासाठी असलेली लोकसंख्या धोरणे इत्यादीचा समावेश या भागामध्ये होतो. वरीव सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती विस्तृत स्वरुपाचा आहे असे लक्षात येते.


Thank you


WELCOME

# TYPES AND SOURCE OF POPULATION DATA

Name :- Dr Siddharth S Ghoderao

Department of Geography

Vivekanand College, Kolhapur

**लोकसंख्या**

लोकसंख्या एखाद्या राजकीय वा भौगोलिक क्षेत्रातील विशिष्ट काळातील एकूण लोक म्हणजे लोकसंख्या होय



- लोकसंख्या आकडेवारी

घनता, जन्म, मृत्यू, वय, लिंग, वंश इत्यादींची संख्या म्हणजे लोकसंख्या आकडेवारी होय

- लोकसंख्या आकडेवारीचे महत्व

➢ आर्थिक


➢ सामाजिक

➢ राजकीय

# Sources of Data


- Primary Data
  प्राथमिक आकडेवारी
- Secondary data
  द्वितीय आकडेवारी

# Primary Data




Primary Data Collection Methods
Interview
Questionnaires and Surveys
Observation
Experiments


# Primary Data










DATA COLLECTION
census
Primary data
questionnaires
interviews
newspapers
Secondary data
websites
research journals
Data collection
Statistical analysis
....
...

# Secondary Data



भारत की जनगणना

CENSUS OF INDIA

2021

Thank You..